संपूर्ण महाराष्ट्रातील दहावीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी **"रोबोमेट+ ॲप मोफत"**

महाराष्ट्राचे माननीय शिक्षण मंत्री श्री. विनोदजी तावडे हे आज ६ डिसेंबर २०१७ रोजी मंत्रालयात, संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता दहावीच्या (मार्च २०१८ परीक्षा) विद्यार्थ्यांसाठी **"रोबोमेट+"** या शैक्षणिक ॲप (पूर्णपणे मोफत) चे अनावरण / उद्घाटन करतील. ग्लोबल एज्यूकेशन ट्रस्ट ही शिक्षण, आरोग्य, सेवा, पोषण, व्यवसायिक प्रशिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात सामाजिक कार्य करणारी संस्था आहे. ग्लोबल एज्यूकेशन ट्रस्टने महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम सुरू केला आहे.

११५ दशलक्ष लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात यावर्षी १७ लाख विद्यार्थी दहावीच्या परीक्षेस बसले आहेत व त्यातील बहुसंख्य विद्यार्थी हे मराठी माध्यमाचे आहेत. मा. शिक्षणमंत्री श्री. विनोदजी तावडे यांच्या मते एखाद्या देशाची वा राज्याची प्रगती ही जनतेला मिळणाऱ्या दर्जेदार शिक्षणावरुन ठरते. या विचारेतूनच 'ग्लोबल एज्यूकेशन ट्रस्ट' च्या मदतीने पूर्णपणे मोफत **"रोबोमेट+"** हे ॲप विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्याचा विचार ठरला.

**"रोबोमेट+"** हे ॲप व्हिडीओ लेक्चर्सच्या स्वरुपात २४x७ विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध आहे. यात तज्ञ शिक्षकांची व्हिडीओ लेक्चर्स, प्रश्नोत्तरे, प्रश्नपत्रिकांचे स्वरुप, बहुपर्यायी प्रश्न, कठीण संकल्पना सोप्या भाषेत, शंकानिरसन (Doubt solving) अशा सर्व बाबींचा समावेश आहे. ज्याच्या कधीही कुठेही वापर करुन विद्यार्थी गुणांमध्ये भरघोस वाढ करु शकतो.

**"रोबोमेट+"** हे मराठी माध्यमांच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांसाठी खूप फायदेशीर ठरले आहे. उत्कृष्ट क्वालिटीच्या व्हिडीओ लेक्चर्सच्या माध्यमांतून त्यांना कधीही आणि कुठेही तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकते.

एस्. एस्. सी मराठी माध्यमाचे शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी रोबोमेट+ android फोनवर पुढीलप्रमाणे डाउनलोड करू शकतो. गुगल प्लेस्टोरवर जाऊन 'रोबोमेट+' निवडा व Free10 (no space in between) हा प्रोमोकोड वापरून रजिस्टर करा.

भारताचे लाडके पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'डीजीटल इंडियाची' संकल्पना मांडली. त्याच मार्गावरुन पुढे जात श्री. विनोदजी तावडे म्हणाले की, रोबोमेट+ या ॲपचा वापर करुन विद्यार्थी त्यांच्या गतीने शिक्षणाचा आनंद घेतील. महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग व ग्लोबल एज्यूकेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी त्यांच्या गुणवत्ता वाढीचे स्वप्न साकार करतील. आम्हांला खात्री आहे की या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास प्राप्त होईल व राज्याच्या एस्. एस्. सी बोर्डाच्या परीक्षांमध्ये 100% निकालाचे स्वप्न साकार होईल.